# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.05.2024** **वारःमंगळवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात राज्यातल्या 11 मतदारसंघांत शांततेत मतदान
2. बीडमध्ये सर्वाधिक; तर पुण्यात सर्वात कमी मतदानाची नोंद
3. मुंबईत जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेत 14 जणांचा मृत्यू; मृतांच्या वारसांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर आणि
4. गडचिरोलीमध्ये चकमकीत तीन नक्षलवादी ठार

**<u>मतदान</u>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात काल राज्यात शांततेत मतदान पार पडलं. पुणे जिल्ह्यातील पुणे शहर, शिरुर, आणि मावळसह, अहमदनगर, शिर्डी, नंदुरबार, जळगाव, रावेर, जालना, औरंगाबाद आणि बीड या 11 लोकसभा मतदारसंघांमध्ये मिळून सरासरी 59 पूर्णांक 64 शतांश टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

सर्वाधिक सुमारे 70 टक्के मतदानाची नोंद बीडमध्ये झाली. त्याखालोखाल जालन्यात 68 तर नंदूरबारमध्ये 67 टक्के मतदान झालं. सर्वात कमी 51 पूर्णांक 25 शतांश टक्के मतदान पुणे लोकसभा मतदारसंघात झालं. शिरुरमध्ये 51 पूर्णांक 46 आणि मावळमध्ये 52 पूर्णांक 90 शतांश टक्के मतदानाची नोंद झाली. जळगाव मतदारसंघात सुमारे 53, रावेरमध्ये 61, औरंगाबादमध्ये 60 टक्क्यांहून अधिक, अहमदनगरमध्ये 62 पूर्णांक 76 शतांश आणि शिर्डीत 61 पूर्णांक 13 शतांश टक्के मतदानाची नोंद झाली.

**<u>उमेदवार</u>**

राज्यात चौथ्या टप्प्यात झालेल्या निवडणुकीत केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे, मंत्री संदीपान भुमरे, पंकजा मुंडे, चंद्रकांत खैरे, मुरलीधर मोहोळ, रविंद्र धंगेकर, वसंत मोरे तसंच खासदार हीना गावित, रक्षा खडसे, इम्तियाज जलील, अमोल कोल्हे, श्रीरंग बारणे, सुजय विखे-पाटील, सदाशिव लोखंडे यांच्यासह 298 उमेदवारांचं भवितव्य काल मतदानयंत्रात बंद झालं.

**<u>पुणे मतदान</u>**

पुणे जिल्ह्यात पुणे शहर, मावळ आणि शिरुर लोकसभा मतदारसंघात काल झालेल्या मतदान प्रक्रियेत ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, महिला, गर्भवती महिला, तृतीयपंथीय, नवमतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला. पुणे शहर मतदारसंघातील मतदानाबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**पुणे लोकसभा मतदार संघात मतदारांच्या स्वागतासाठी अनेक केंद्रांवर विशेष सजावट करण्यात आली होती. तर काही ठिकाणी रांगोळ्यांच्या पायघड्या घातल्यानं मतदान प्रक्रियेला उत्सवाचं स्वरूप प्राप्त झालं होतं. शहरातील मध्यवर्ती पेठांच्या भागासह शुक्रवार पेण, सिंहगड रस्ता आणि कोथरूड यासारख्या भागात सकाळी-सकाळीच अनेक मतदान केंद्राबाहेर मतदारांच्या मोठमोठ्या रांगा लागल्याचं चित्र दिसून आलं. पुण्यात राहणाऱ्या नाट्य-चित्रपट अभिनेत्यांनी देखील सकाळी-सकाळी जाऊन आपला मतदानाचा हक्क बजावला. पुणे शहर लोकसभा मतदार संघातील प्रत्येकी 5 मतदान केंद्र**

**महिला, युवा आणि दिव्यांग कर्मचारी अधिकाऱ्यांना संचालित करण्यासाठी आली होती. शिवाय यंदा प्रथमच मोठ्या गृहनिर्माण सोसायट्यांमधून देखील एकंदर 35 मतदान केंद्र सुरु करण्यात आल्यानं त्याचा फायदा स्थानिक मतदारांना झाला.**

**<u>मावळ मतदान</u>**

मावळ मतदारसंघात झालेल्या मतदानाबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून......

**महिला सबलीकरण, दिव्यांग मतदान केंद्र, पुरुषांसाठीचा स्वातंत्र्य बूथ, तरुण वर्गासाठी युथ केंद्र, महाराष्ट्रातल्या गड किल्ल्यांची माहिती देणारा बूथ, तर मतदान केंद्राची सर्वसामान्य रचना असणारे मॉडेल केंद्र अशा संकल्पना यंदा मावळ लोकसभा मतदारसंघात राबवण्यात आल्या. सकाळच्या सत्रात जवळपास सर्वच मतदान केंद्रांमध्ये नागरिकांनी मतदानासाठी गर्दी केली होती. सकाळच्या सत्रात मावळ मतदार संघातील जवळपास आठ ईव्हीएम यंत्रणांमध्ये बिघाड झाल्याने काही काळ मतदान थांबवण्यात आले होते. जवळपास अडीच हजार मतदान केंद्रावर प्रत्यकी अडीच हजार अधिकारी, कर्मचारी, पथके नियुक्त करण्यात आले होते. आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून सीमा चोरडिया.**

**<u>शिरूर मतदान</u>**

पुणे जिल्ह्यात बारामती पाठोपाठ लक्षवेधी ठरलेल्या शिरूर लोकसभा मतदार संघातही काल उत्साहात मतदान झालं. शिरूर मतदारसंघातील मतदानाविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**बहुतांशी ग्रामीण भाग असणाऱ्या या मतदारसंघात सकाळपासून मतदारांत उत्साह दिसून आला. घोडेगाव जुन्नर परिसरातील आदिवासी पट्ट्यातील गावांतही मतदार आपल्या कर्तव्याप्रती जागरूक असल्याचे दिसले. एकाच वाहनातून गटागटांनी येऊन या आदिवासी भागातील मतदारांनी मतदान केलं. चाकण, शिरोली आणि राजगुरुनगर या भागात तर दुपारी भर उन्हात रांगा लागल्या असल्याचे पाहायला मिळाले. त्यात अगदी नव मतदारांपासून ते 80-90 वय ओलांडलेले ज्येष्ठ नागरिकही सहभागी झाले होते. निवडणूक कर्मचारी आणि पोलीसानी देखील यावेळी मतदारांसाठी मदतनिसाची भूमिका बजावली. संध्याकाळच्या वेळेस शिरूर लोकसभा मतदार संघाअंतर्गत असणाऱ्या पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरालगतच्या हडपसर तसेच भोसरी इथल्या उपनगरांत मतदारांनी मतदान केंद्रांवर गर्दी केली होती. एकूणच लोकसभा निवडणुकीचा लोकशाही उत्सव हा लोकांनी उत्साहात साजरा केला. आकाशवाणी बातम्यांसाठी संतोष गोगले शिरूर.**

**<u>मतदान</u>**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात अकरा पर्यावरणस्नेही मतदान केंद्रांसह तीन हजार 85 मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली. अहमदनगर, बीड जालन्यातही विविध संकल्पनांवर आधारित मतदान केंद्र तयार करण्यात आली होती. जळगाव जिल्ह्यातील अनेक मतदान केंद्रावर वेब कॅमेऱ्याच्या माध्यमातून लक्ष ठेवण्यात आलं होतं.

**<u>गृह मतदान-मुंबई</u>**

राज्यात पाचव्या टप्प्यात होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर वयोवृद्ध आणि दिव्यांग मतदारांसाठी गृहमतदानाला सुरुवात झाली आहे. दहिसर विधानसभा मतदारसंघात काल 104 वर्षांच्या आजींनी गृह मतदानाचा हक्क बजावला.

**<u>अमित शहा-पालघर, धुळे</u>**

देशाची अर्थव्यवस्था तिसऱ्या क्रमांकावर आणण्यासाठी ही निवडणूक आहे, असं मत केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे वरिष्ठ नेते अमित शाह यांनी पालघर जिल्ह्यातल्या वसईमध्ये केलं. भाजपचे लोकसभेचे उमेदवार डॉ. हेमंत सवरा यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते काल बोलत होते.

धुळे लोकसभा मतदारसंघातील भाजप महायुतीचे उमदेवार डॉ. सुभाष भामरे यांच्या प्रचारार्थ अमित शहा यांची काल धुळ्यातही जाहीर सभा झाली. भारताला सक्षम, विकसित राष्ट्र बनवणं ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची हमी आहे, देशाला सक्षम नेतृत्व नरेंद्र मोदीच देऊ शकतात, असं ठाम प्रतिपादन अमित शहा यांनी यावेळी केलं. विरोधकांच्या इंडिया आघाडीवर तसंच माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे, कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर त्यांनी घणाघाती टीका केली.

**<u>कॉंग्रेस प्रचार मुंबई</u>**

पंतप्रधान आपल्या भाषणातून धार्मिक विभाजनाची भाषा करत आहेत, अशी टीका काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत केली. येत्या 17 मे रोजी इंडिया आघाडीचे नेते वांद्रे कुर्ला संकुलात संयुक्त प्रचार सभा घेणार आहेत, असं त्यांनी सांगितलं. महाराष्ट्रासह देशभरात महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीच्या बाजूने वातावरण असल्याचही चेन्नीथला यांनी यावेळी सांगितलं.

**<u>CBSE</u>**

सीबीएसई अर्थात केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात आलेल्या दहावी आणि बारावीच्या परीक्षेचा निकाल काल जाहीर झाला. बारावीच्या परीक्षेत 87 पूर्णांक 98 शतांश टक्के तर दहावीच्या परीक्षेत 93 पूर्णांक 60 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

**<u>घाटकोपर-पाऊस -मुख्यमंत्री</u>**

मुंबईसह उपनगरात काल दुपारनंतर सोसाट्याच्या वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडला. यावेळी घाटकोपरमधल्या छेडानगर भागात एका पेट्रोल पंपावर आणि आजूबाजूच्या घरांवर 100 उंच जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेत 14 जणांचा मृत्यू झाला तर 43 जण जखमी झाले. अग्निशमन दलानं अनेकांना सुरक्षित बाहेर काढलं असून बचाव कार्य अजूनही सुरू आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. तसंच या दुर्घटनेला जबाबदार असणाऱ्यांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंबईतल्या अशा सर्व जाहिरात फलकांचं ऑडीट करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या असून अनधिकृत फलकांवर कारवाई करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या दुर्घटनेच्या उच्चस्तरीय चौकशीचे आदेश राज्याचे गृहमंत्री देवेन्द्र फडणवीस यांनी दिले आहेत. दरम्यान, या पावसामुळं काल मुंबईतली विमान, रस्ते, उपनगरीय रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली होती. रायगड, ठाणे आणि नवी मुंबईतही काल संध्याकाळी जोरदार वा-यासह अवकाळी पाऊस झाला.

**<u>महिला नक्षली ठार-गडचिरोली</u>**

गडचिरोलीतामध्ये पोलिसांचा घातपात करण्याच्या तयारीत असलेल्या नक्षल्यांचा कट सी- 60 पथकाच्या जवानांनी काल उधळून लावला. यावेळी झालेल्या चकमकीत तीन नक्षली ठार झाले; यात पेरिमिली दलमचा प्रभारी आणि नक्षल्यांच्या विभागीय समितीचा कमांडर वासू याच्यासह दोन महिला नक्षलींचा समावेश आहे. घटनास्थळावरून शस्त्रास्त्र जप्त करण्यात आल्याची माहिती पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी दिली.

**<u>हवामान</u>**

कोकणात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांसह पाऊस पडेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.